**प्रेसनोट दिनांक ०२/०४/२०१९**

## फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे

### बुधवार पेठ, पुणे येथे कोंबिंग ऑपरेशन दरम्यान महिला फरारी आरोपी अटक

दि.३०/०३/२०१९ रोजी मा. सुहास बावचे सर यांचे मार्गदर्शनाखाली लोकसभा निवडणुकी दृष्टीने बुधवार पेठ भागामध्ये कोबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. त्यामध्ये फरारी महिला रा. १०१०, बुधवार पेठ, दुसरा मजला, पुणे ही मिळुन आली. ती पोलीस स्टेशन फरासखाना पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. २८५/२०१७ भा.द.वि. कलम ३६६,३७०(२),३७०(अ)२,३४४,१०९, पिटा ॲक्ट ३,४,५,६,७ व पालघर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.१५६/२०१७ भा.द.वि.कलम ३७६,१२०(ब), पोस्को ॲक्ट या गुन्ह्यात फरारी होती. ती मुलींना फुस लावुन देहविक्री करण्यास विक्रीचा व्यवसाय करते. तिला फरासखाना पोलीस स्टेशनकडील गुन्ह्यात अटक करुन, तिला मा. न्यायालयात हजर केले असुन, तिला दि. ०२/०४/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड मंजुर केली आहे.

सदरची कारवाई मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १, पुणे शहर, मा.प्रदीप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग, पुणे शहर व किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. त्यामध्ये १५ पोलीस अधिकारी व ७० पुरुष महिला पोलीस कर्मचारी सहभागी होते.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे